# महिन्द्रा लाइफस्पेसेस चे नागपूरकरांसाठी 'ग्रीन लिविंग'

## ब्लुमडेल ला इंडियन ग्रीन बिल्डिंग काउंसिलचे 'गोल्ड' पुर्व प्रमाणीकरण प्राप्त

नागपूर, गुरुवार (एनएनपी) : महिन्द्रा लाइफस्पेसेस आणि बी.इ. बिलेमोरिया यांच्या सहयोगाने विकसित होणारे ब्लुमडेल हे कंपनीच्या अनेक मोठ्या रहिवासी प्रकल्पापैकी एक असुन नागपूरच्या मिहान परिसरात २५.२५ एकर जागेवर उभारल्या जात आहे. ब्लुमडेल ला सीआयआय-आयजीबीसी ग्रीन होम रेटिंग सिस्टम अंतर्गत नुकतेच इंडियन ग्रीन बिल्डिंग काउंसिल द्वारे 'गोल्ड' हे पुर्व प्रमाणिकरण मिळाले आहे. 'ग्रीन' हे महिन्द्र लाइफस्पेसच्या त्यांच्या ग्राहकांसोबत असलेल्या नात्याचा पाया आहे. पृथ्वी वरील दुलर्भ होत असलेल्या संसाधनांना सुरक्षित ठेवणे संकल्पनेवर आधारित कंपनीचे शाश्वत शहरीकरणाला साजशे तत्व प्रत्येक प्रकल्पाच्या बाबतीत आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरण संबंधी बाबींचे पुर्ण दक्षता घेते.

महिन्द्रा लाइफस्पेसेस ने जणु 'ग्रीन होम्स' चळवळीसाठी स्वतःला सज्ज केले असुन २००७ पासुनच आपल्या प्रत्येक नव्या प्रकल्पात पर्यावरण पुरकता आणि हिरवळीला कायम ठेवण्याबाबत महिन्द्रा लाइफस्पेसेस आग्रही असते. 'शाश्वत शहरीकरण' हे योग्य रितेने प्रत्यक्षात आणण्यासाठी इंडियन ग्रीन बिल्डिंग काउंसिल प्रमाणिकरण हा महिन्द्राच्या अनेक दृष्टीकोणांपैकी एक आहे.

लिमिटेडच्या व्यवस्थापकिय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आणि ग्रुप एक्जीक्युटीव बोर्डाच्या सदस्या श्रीमती अनिता अर्जुनदास यांनी सांगितले की, 'भारतात शाश्वत शहरी समुदाय ह्या संकल्पनेवर लक्ष केन्द्रीत करून स्वस्थ, पर्यावरण अनुकुल राहणीमान उपलब्ध करविण्यासाठी महिन्द्रा लाइफस्पेसेस सदैव अग्रेसर असते. आम्ही नेहमीच अपरिहार्य आणि जबाबदार शहरीकरण यातले सामजंस्यपुर्ण संतुलन कायम ठेवण्याचा प्रयत्न करतो आणि त्यामुळे बांधकामाच्या शाश्वत पद्धतींना प्रोत्साहीत करून पर्यावरण पुरक व्यवसायाचा मार्ग नियोजित करता येणे शक्य झाले आहे.'

आम्ही अवलंबलेल्या पर्यावरण पुरक पद्धतींच्या उद्देश आहे की, पाणी, उर्जा आणि अन्य संसाधनांचा अल्प वापर, तसेच पर्यावरणाला धोकादायक असणारा कचरा कमीत कमी उत्पन्न होईल याची खबरदारी घेणे. यामुळे एकुणच पर्यावरणातील कार्बन अंश कमी होण्यास मदत होईल. महिन्द्रा लाइफस्पेसच्या ०९ रहिवाशी योजनांना आतापर्यंत ग्रीन बिल्डींग

प्रमाणीकरण प्राप्त झाले असुन,एका प्रकल्पाने या प्रमाणप्रत्रासाठी अर्ज केलेला आहे. सीआयआय-आयजीबीसी ग्रीन होम रेटींग सिस्टम अंतर्गत फरिदाबाद येथील क्लोरिस प्रकल्पाला ग्रीन बिल्डींग प्लॅटीनम प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

वर्ष २०११-१२ मध्ये एमएलडीएल ने फ्लाय ॲश चा उपयोग करून ३८९४० चौमी टॉप सॉइल संरक्षित केली असुन कार्बन डायऑक्साइड चे उत्सर्जन १५३७२ मेट्रीक टन ने कमी केले आहे. शाश्वत विकासाच्या पुढाकाराचा एक भाग म्हणुन, एमएलडीएल, जीआरआय च्या इंटरनॅशनल कंपेअर ॲबीलीटी ऑफ रिर्पोटिंग रिजल्ट ला पुर्ण समर्थन देते आणि वर्ष २००७-०८ पासुन जीआरआर रिर्पोटिंग प्रक्रियेचा भाग आहे.

ब्लुमडेल चे बांधकाम होत असताना पाळल्या जाणाऱ्या पर्यावरण पुरक पुढाकारांमध्ये पुढील बाबींचा समावेश आहे.

- एअर कंडिशनिंग उपलब्ध करविताना विद्युत खपत कमी करण्याच्या हेतुने 'लो एनर्जी
- वेंटिलेशन ची सुविधा अधिक चांगल्या प्रकारे करण्यासाठी खिडकिची जागा आणि भिंत यांचा योग्य अनुपाताचे प्रावधान
- अपार्टमेंट ही आतुन देखिल पर्यावरण पुरक व्हावी यासाठी कमी तजउ (वॉलटाइल ऑर्गेनिक कंपाउड) असलेले पेन्ट, अडेसिव आणि सिलन्टस् चा उपयोग.
- कमी प्रांगण क्षेत्र, झेरियास्कोपिंग, पावसाच्या पाण्याच्या संचयनाची व्यवस्था आणि वादळी पावसाच्या पाण्याचे प्रबंधन या सोबत परिदृश्याचा विकास
- भवष्यातील भूनिर्माण प्रक्रियेसाठी टॉप सॉईल चे संरक्षण
- घरात, पाण्याचा प्रवाह कमी करणाऱ्या वॉटर फॉसेट्सचा अंतर्भाव
- उर्जा कुशल विद्युत प्रतिष्ठान

फेब्रुवारी २०१२ मध्ये लॉंच झालेल्या ब्लुमडेल मध्ये १ बीएचके, २ बीएचके, ३ बीएचके, अपार्टमेंट रो-हाउस आणि ड्युपलेक्स घराचे सर्व पयार्य उपलब्ध आहेत. इंडियन ग्रीन बिल्डींग काउंसिल (आयजीबीसी) च्या दिशा निर्देशांची अंमलबजावणी केल्याने आणि 'ग्रीन' पर्यावरण पुरक वातावरणामुळे आपोआपच पाणी आणि विजेचा वापर कमी करणे शक्य होईल ज्यामुळे एकुणच इथले रहिवासी पर्यावरण संरक्षण आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यात